-80'

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** फलटण शहर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0136 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/04/2019 05:45 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 15 |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | 365 |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | 392 |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | 427 |
| 6 | भारतीय दंड संहिता १८६० | 201 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 17/04/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/04/2019
**Time From (वेळेपासून):** 09:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 02:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/04/2019 **Time (वेळ):** 05:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 008 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/04/2019 05:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 30 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** उपविभागीय अधिकारी सा ो फलटण विभ

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Recd copy
[signature]

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अड. श्री. राजकुमार एकनाथ चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 1968 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ऊरळी कांचन, ता हवेली जिपुणे ,हवेली,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ऊरळी कांचन, ता हवेली जिपुणे ,हवेली,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ड. श्री. अभिजीत शिवाजीराव पाटील | | | 1. शासकीय निवासस्थान, फलटण, फलटण शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत<br>2. प्लट नं 6, स्वातंत्र सैनिक क,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

मी, अड. श्री. राजकुमार एकनाथ चव्हाण, वय 51 वर्षे, धंदा - वकीली व्यवसाय, रा. ऊरळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे. मो 9834687008.समक्ष हजर राहुन जबाब लिहुन देतो, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबीयासह राहणेस असुन मी गेले 27 वर्षापासुन पुणे जिल्हा न्यायालय येथे वकीली व्यवसाय करत आहे. दिनांक 16/04/2019 रोजी मी स्वत: अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे कार्यालय येथे येवुन मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधिक्षक यांची त्यांचे कार्यालयात भेट घेतली. मी त्यांना श्री. अभिजीत पाटील, पोलीस उप अधिक्षक, फलटण यांनी माझेकडे 2,50,000/- रुपये लाचेच्या मागणी केली असुन माझी त्यांच्याविरुध्द लाचेची तक्रार आहे. लाच रक्कम कधी घेवुन यावयाचे याबाबत मला ते दि. 16/04/2019 रोजी सायंकाळी 06/30 वा. फोन करुन सांगणार आहेत वगैरे माहिती मी दिली. त्यानंतर मा. पोलीस अधिक्षक,

अँन्टी करप्शन ब्युरो पुणे यांनी मा. श्रीमती सुषमा चव्हाण मडम, अपर पोलीस अधिक्षक, यांना त्यांचे कार्यालयात बोलावुन घेवुन माझे तक्रारी प्रमाणे योग्य ती कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले. त्यानंतर मी श्रीमती चव्हाण मडम यांना वरील प्रमाणे माहिती देवुन श्री. अभिजीत पाटील, पोलीस उप अधिक्षक, फलटण हे मला आज सायंकाळी 06/30 वा. फोन करणार आहेत, असे सांगितले. त्यानंतर मी एसीबी कार्यालय पुणे येथुन निघुन आलो. दिनांक 16/04/2019 रोजी सायंकाळी 07:00 वा. मी माझे घरी असताना श्री. अभिजीत पाटील पोलीस उप अधिक्षक, फलटण उप विभाग, जि. सातारा यांचा मला फोन आला व त्यांनी मला कोठे आहेस? असे विचारले, मी त्यांना घरी आहे असे सांगितले. त्यावेळी श्री. पाटील यांनी उदया मला बंदोबस्त आहे, तुम्ही सकाळी 09:00 वा. माझे फलटण येथील कार्यालयामध्ये या असे सांगितले. त्यानंतर मी श्रीमती सुषमा चव्हाण मडम यांना फोन करुन वरील सर्व हकीकत सांगितली, त्यांनी मला दिनांक 17/04/2019 रोजी सकाळी 07:30 वा. लोणंद या ठिकाणी या असे सांगितले.दिनांक 17/04/2019 रोजी सकाळी 07:30 वा. सुमारास श्रीमती सुषमा चव्हाण मडम यांनी मला फोन केला व मला लोणंद बाजारतळ येथे या असे सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील टाटा सफारी वाहन क्रमांक एमएच 12 ईजी 5051 यामधुन त्यावरील चालक नामे दत्तात्रय लवांडे यांच्यासह बाजारतळ लोणंद या ठिकाणी आलो. सदर ठिकाणी श्रीमती सुषमा चव्हाण मडम यांची भेट घेतली. त्या त्यांचे स्टाफसह थांबुन होत्या. सदर ठिकाणी श्रीमती सुषमा चव्हाण मडम यांनी प्रथम माझी व त्यानंतर श्री. अशोक शिर्के, पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन सातारा युनिट, श्रीमती कांचन जाधव, पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे, पोलीस नाईक कुंभार, पोलीस नाईक माळी तसेच एकनाथ रामदास पोपळभट, राज्य कर निरीक्षक, जी.एस.टी. भवन येरवडा पुणे, लक्ष्मण पिलाजी भोईर, राज्य कर अधिकारी, जी.एस.टी. भवन येरवडा पुणे, यांची ओळख करुन देवुन ते कारवाई कामी शासकीय पंच असल्याची माहिती दिली. त्यानंतर सदर कारवाईकामी सापळा अधिकारी म्हणुन श्री. अशोक शिर्के हे तसेच मार्गदर्शन अधिकारी म्हणुन श्रीमती कांचन जाधव हया असल्याची माहिती दिली. त्यानंतर श्री. अशोक शिर्के यांनी मला शासकीय वाहनात बसण्याची सुचना दिली व लाचेच्या मागणीची लेखी तक्रार देण्यास सांगितली, ती खालील प्रमाणे आहे.माझा वरील प्रमाणे व्यवसाय असुन सौ. निलम वैभव धामणकर व श्री. वैभव धामणकर यांनी माझे पक्षकार श्री. रामदास बबन जाधव, रा. केसुर्डी ता. खंडाळा, श्री. शिवाजी शंकर कदम रा. सदर, व लीलाबाई चंद्रकांत नानगुडे रा. परिंचे ता. पुरंदर जि. पुणे यांना आमचा सोन्याचे बिस्कीट तयार करण्याचा व्यवसाय असुन आपण आमच्याकडे गुंतवणुक केली तर दीड वर्षात दाम दुप्पट करुन मिळेल असे सांगितले. त्यामुळे माझे नमुद पक्षकार यांनी श्री. व सौ. धामणकर यांच्या बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा पान क्रमांक 02शिरवळ येथील बँक खात्यावर 1,25,00,000/- रुपये आर.टी.जी.एस. द्वारे ट्रान्सफर केले. दोन वर्षानंतरही श्री. धामणकर यांनी माझे पक्षकारास ठरल्याप्रमाणे दुप्पट रक्कम अथवा गुंतवलेली रक्कम परत केली नाही म्हणुन माझे पक्षकार यांनी दिनांक 17/01/2019 रोजी श्री. व सौ. धामणकर यांच्याविरुध्द खंडाळा पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज दिला. सदर तक्रार अर्जाची चौकशी श्री. अभिजीत पाटील, पोलीस उप अधिक्षक, फलटण यांनी करुन त्यांचे जबाब नोंदविले आहेत. त्यानंतर दिनांक 25/01/2019 रोजी पक्षकार श्री. रामदास जाधव यांची फिर्याद घेवुन श्री. व सौ. धामणकर यांच्याविरुध्द खंडाळा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क्रमांक 20/2019 भा. द. वि. कलम 420, 34 प्रमाणे दाखल केला असुन सदर गुन्हयाचा तपास श्री. पाटील, पोलीस उप अधिक्षक, फलटण विभाग यांच्याकडे आहे.गुन्हयातील आरोपी श्री. व सौ. धामणकर यांनी गुन्हयात अटकपुर्व जामीन मिळावा म्हणुन प्रथम सत्र न्यायालय सातारा येथे अर्ज दाखल केला. सदर अर्जावरुन मा न्यायालयात सुनावणी होवुन त्यांचा जामीन अर्ज फेटाळला. त्यामुळे नमुद आरोपी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे अटकपुर्व जामीन मिळावा म्हणुन अपील अर्ज दाखल केले. सदर ठिकाणीही दोन्ही आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला. त्यानंतर काही दिवसांनी श्री. पाटील यांनी मला त्यांचे कार्यालयात बोलावुन घेवुन गुन्हयातील आरोपी माझे संपर्कात असुन ते तुमच्या समोर येणार नाहीत, फसवणुकीतील रक्कमेबाबत आरोपी तडजोड करण्यास तयार आहेत. त्यावेळी मी त्यांना आमचे पक्षकारांनी ती रक्कम गुंतविलेली आहे ती रक्कम त्यांना परत करण्यास सांगा असे म्हणालो, त्यावेळी श्री. पाटील यांनी मला दोन्ही आरोपींशी संपर्क करुन त्यांच्याशी बोलुन आपणास कळवितो, असे सांगितले. त्यानंतर दोन दिवसांनी मला त्यांचे फलटण येथील कार्यालयात बोलावुन घेवुन आरोपी तडजोड करण्यास तयार असुन ते तुमचे तिन्ही पक्षकार यांचे मिळुन 1,10,00,000/ रूपये देण्यास तयार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे मी, पक्षकार व आरोपी यांचेत दिनांक 18/03/2019 रोजी शंभर रुपयाचे स्टम्प पेपरवर करारनामा करुन त्याची प्रत श्री. अभिजीत पाटील यांना दिली. त्यानंतर गुन्हयातील दोन्ही आरोपी यांनी माझे पक्षकारांच्या बँक खात्यावर प्रत्येकी 8 लाख रुपये आरटीजीएस केले. दिनांक 07/04/2019 रोजी श्री. पाटील, पोलीस उप अधिक्षक, यांनी त्यांचेकडील मो. क्र. 9765455891 वरून माझ्या मोबाईलवर फोन करुन आता श्री. व सौ. धामणकर यांनी माझेकडे तुमच्या पक्षाकारांच्या नावे प्रत्येकी 8 लाख रुपयांचे डी.डी. दिले आहेत असे सांगुन माझे कार्यालयात येवुन घेवुन जा असे सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 08/04/2019 रोजी त्यांचे कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी श्री. पाटील, पोलीस उप अधिक्षक फलटण यांनी मला मी सर्व तडजोड करुन दिली आहे, माझे काय? असे म्हणुन माझ्याकडे 2 लाख 50 हजार रुपयाची मागणी केली. त्यावेळी माझ्या पक्षकारांची पुर्ण रक्कम मिळालेली नाही, त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे असे म्हणालो असता श्री. पाटील यांनी मी दोन्ही आरोपींना अटक केली असती तर तुमच्या पक्षकारांना एक रुपयाही मिळाला नसता, असे म्हणुन माझे कडे 2 लाख 50 हजार रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना माझे पक्षकारांचे नावाचे प्रत्येकी 8 लाख रुपयांचे डी. डी. माझेकडे दया असे म्हणलो असता त्यांनी लिलाबाई नानगुडे व शिवाजी कदम यांचे प्रत्येकी आठ लाख रूपयाचे डी. डी. मला दिले. श्री.रामदास जाधव यांच्या नावे असलेला 8 लाख रुपयांचा डी. डी. श्री. पाटील यांनी स्वता:कडे ठेवुन घेतला व दिनांक 16/04/2019 रोजी 2 लाख 50 हजार रुपये घेवुन आलेनंतर रामदास जाधव यांच्या नावे असलेला 8 लाख रुपयांचा डी. डी. तुम्हाला देतो असे सांगुन मला जाणेस सांगितले. तसेच धामणकर यांचे एचडीएफसी बँकेचे अकाऊंटवरील दि. 16/08/2019 रोजीचे श्री. रामदास जाधव यांना चेक क्रमांक 417 अन्वये 25 लाख रूपये, चेक क्रमांक 418 अन्वये श्रीमती लिलाबाई पान क्रमांक 03नानगुडे यांना 22 लाख रूपये व श्री. शिवाजी कदम यांना चेक क्रमांक 419 अन्वये 15 लाख 50 हजार रूपये याप्रमाणे पोस्ट डेटेड चेक देतो असे सांगितले. दिनांक 16/04/2019 रोजी मी दुपारी 01.00 वाजता श्री. अभिजीत पाटील,पोलीस उप अधिक्षक, फलटण उपविभाग यांना त्यांचेकडील मो. क्र. 9765455891 वर माझ्या मोबाईलवरून फोन केला असता, श्री. पाटील यांनी संध्याकाळी 06.30 वाजता मी तुम्हाला फोन करतो व केव्हा यायचे ते सांगतो असे सांगितले होते. त्यामुळे श्री. अभिजीत पाटील यांनी माझेकडे मागिलेली 2 लाख 50 हजार रुपये ही लाच रक्कत असुन ती दिल्याशिवाय श्री. अभिजीत पाटील,पोलीस उप अधिक्षक, फलटण उपविभाग हे मला रामदास जाधव यांचे नावाचा डी. डी. देणार नाहीत अशी माझी खात्री झाली. त्याबाबत मी, रामदास जाधव व शिवाजी कदम यांचेशी मी फोनवर बोललो असता त्यांनी मला सदरचे काम करण्यास लेखी अधिकार पत्र दिलेले असुन त्याकरिता आवश्यक असणारी पुर्तता आपण करावी असे सांगितले तसेच श्री. अभिजीत पाटील, पोलीस उप अधिक्षक, फलटण उपविभाग यांना दयावयाची लाच रक्कम आपणच दयावी असे सांगितले. दिनांक 16/04/2019 रोजी श्री. अभिजीत पाटील, पोलीस उप अधिक्षक, फलटण उपविभाग यांनी सायंकाळी 07:00 वा. च्या सुमारास त्यांच्याकडील वर नमुद मोबाईलवरुन माझे मोबाईलवर संपर्क साधुन आजरोजी सकाळी 09:00 वा. मला त्यांचे फलटण येथील कार्यालयात येण्यास सांगितलेले आहे. माझेत व श्री. पाटील यांचेत रोख रक्कम देण्या घेण्याचा व्यवहार नसुन आमचेत भांडणतंटा नाही. माझे पक्षकारांच्या वतीने श्री. पाटील यांना लाच देण्याची इच्छा नाही म्हणुन श्री. अभिजीत पाटील, पोलीस उप अधिक्षक, फलटण उपविभाग यांच्याविरुध्द लाचेच्या मागणीची तक्रार असुन त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करावी.मी वरील प्रमाणे दिलेली लेखी तक्रार

वरील दोन्ही पंचांना वाचावयास दिली ती त्यांनी वाचुन त्यावर पंच म्हणुन त्यांनी व समक्ष म्हणुन श्री. अशोक शिर्के यांनी स्वाक्ष-या केल्यात. त्यानंतर श्री. अशोक शिर्के यांनी मी दिलेल्या लाचेच्या तक्रारीच्या अनुषगाने लोकसेवक श्री. पाटील यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याची खात्री करण्याकरीता माझे सोबत पंच क्रमांक 01 श्री. एकनाथ पोपळभट यांना पोलीस उप अधिक्षक कार्यालय, फलटण येथे पाठवुन पडताळणी करण्यात येणार आहे असे सांगितले. त्यानंतर मला माझे वरील टाटा सफारी वाहनामध्ये बसण्यास सांगुन शासकीय वाहन क्रमांक एमएच 14 सीएल 052 च्या मागेमागे येण्यास सांगितले. सापळा पथकातील वरील अधिकारी व कर्मचारी तसेच दोन्ही पंच असे नमुद शासकीय वाहनातुन बाजारतळ लोणंद येथुन रवाना झाले व मी माझे वरील खाजगी वाहनातुन खाजगी चालकास त्यांचे मागे लोणंद - फलटण रोडने फलटणकडे रवाना झालो. फलटणच्या जवळ आलो असता शासकीय वाहन रोडच्या उजवे बाजुस असलेल्या हटेल महाराजाच्या मोकळ्या जागेत थांबले. त्यामुळे मी आमचेकडील वाहन त्यांच्या वाहनांच्या बाजुस घेण्यास सांगुन पाठोपाठ थांबविले. त्यावेळी श्री. अशोक शिर्के तसेच श्रीमती सुषमा चव्हाण मडम हया तसेच दोन्ही पंच माझे वाहनामध्ये येवुन बसले.त्यानंतर श्री. अशोक शिर्के यांनी त्यांचेकडील सोनी कंपनीचे डिजीटल व्हाईस रेकर्डर व सनडिस्क कंपनीचे 16 जी.बी. क्षमतेचे पकबंद मेमरीकार्ड काढुन दाखविले. व्हाईस रेकार्डर चा कारवाईमधील उपयोग याबाबत मला तसेच दोन्ही पंचांना माहिती दिली. त्यानंतर त्यांचेडील व्हाईस रेकर्डर चालु करुन त्यात यापुर्वीचे संभाषण नसल्याचे माझी तसेच पंचांची खात्री करुन दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने श्री. अशोक शिर्के यांनी रेकर्डर सुरु करुन प्रथम माझे व त्यानंतर पंच क्र. 01 श्री. एकनाथ पोपळभठ यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर श्री. अशोक शिर्के, यांनी पान क्रमांक 04पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे शर्टच्या बनियनच्या आतील बाजुस सेफटी पीनच्या सहाय्याने लावुन मला व पंच क्र. 01 श्री. पोपळभट, यांना सकाळी 09:15 वा. च्या सुमारास माझे वरील वाहनामधुन श्री. अभिजीत पाटील, पोलीस उप अधिक्षक, फलटण यांना भेटणेकामी त्यांचे नमुद कार्यालयाकडे रवाना केले. मी व पंच क्रमांक 01 श्री. पोपळभट असे श्री.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): ~~PRATAP Dhondiram POMAN(I (Inspector))~~ / POBN60854 **or**
अशोक शिर्के पो. उप. अधिक्षक . ला. प्र. वि. सातारा

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): PRATAP Dhondiram POMAN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN60854

पोलीस ठाणे अंमलदार
फलटण पोलीस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

बनियनला असलेले व्हाईस रेकॉर्डर त्यांचे हाताला लागला. तेव्हा त्यांनी ": हे काय आहे ? असे मला विचारणा केली, तेव्हा मी थोडा खाली वाकुन माझा मोबाईल आहे असे खोटे सांगण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी त्याची माझ्याकडे मागणी केली. मी त्यांना नकार दिला असता त्यांनी मला दोन - तीन कान शिलात फटके मारुन माझे बनियनमध्ये हात घालुन जबरदस्तीने व्हाईस रेकॉर्डर खेचुन स्वतःचे ताब्यात घेतला. वरील प्रमाणे श्री. अभिजीत पाटील,उप विभागीय पोलीस अधिकारी फलटण यांनी मी ला.प्र.वि पुणे पथकाकडे त्यांच्या विरोधात दिलेल्या लाच मागणीच्या तक्रारी संबंधाने, संबंधित विभागाकडुन चालु असलेल्या सरकारी कामकाजात कार्यरत असताना, श्री. अभिजीत पाटील,उप विभागीय पोलीस अधिकारी फलटण यांनी माझ्याकडे १,७५,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन ती त्यांना देणेकरीता सापळा कारवाईत असताना त्यांना त्याबाबत काहींतरी संशय आल्याने त्यांनी माझा मोबाईल व ला.प्र.वि पुणे विभागाचे शासकीय व्हॉइस रेकॉर्डर मला मारहाण करुन जबरदस्तीने हिसकावुन घेतले आहे. अदर्की फाटा याठिकाणी असलेल्या हॉटेल फौजी ढाब्याच्या मोकळा पार्कीगमध्ये त्यांचे शासकीय वाहन थांबवुन शासकीय वाहन चालक तसेच पोलीस कर्मचारी यांना वाहनामधुन उतरण्यास सांगितले. त्यानंतर माझे डोक्यास हाताने जोराने मारुन गाडीतुन ढकलुन दिले. तेंव्हा मी त्यांना "साहेब माझा मोबाईल मला परत दया" असे सांगितले असता त्यांनी माझे काहीं न ऐकता मला तेथेच सोडुन, लागलीच तेथुन वाठारच्या दिशेने भरधाव वेगात निघुन गेले. त्यानंतर मी जिंती फाटयाच्या दिशेने चालत येत असताना मला माझी टाटा सफारी व सापळा पथकाची शासकीय सुमो वाहन समोरुन येत असल्याचे दिसले. त्यावेळी मी हात करुन दोन्ही वाहनास थांबविले. त्यावेळी श्री. अशोक शिर्के यांनी प्रथम माझेकडे व्हाईस रेकॉर्डरबाबत तसेच लाच रक्कमेबाबत विचारणा केली, त्यावेळी मी पंचासमक्ष श्री. अशोक शिर्के यांना लाच रक्कम माझेकडे असुन माझा वापरता सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट सीमकार्डसह तसेच शासकीय व्हाईस रेकॉर्डर त्यामधील मेमरी कार्डसह श्री. अभिजीत पाटील यांनी मला हात बुक्यांनी मारहाण करुन जबरदस्तीने हिसकावुन घेवुन त्यांच्या शासकीय वाहनातुन निघुन गेले आहेत असे सांगितले तसेच वरील घटनाक्रमाची सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर अपर पोलीस अधिक्षक श्रीमती चव्हाण मॅडम व सपोआ श्रीमती जाधव मॅडम व पंच क्र. ०१ यांनी रेस्ट हाऊस येथे जावुन श्री. अभिजीत पाटील यांना ताब्यात घेतले. श्रीमती चव्हाण मॅडम यांनी श्री. अभिजीत पाटील यांना घडलेल्या प्रकाराबाबत विचारणा करुन तक्रारदार यांचा मोबाईल व व्हॉईस रेकॉर्डर परत करणेबाबत सांगितले. तेव्हा श्री. पाटील यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिले, व मला काहीं माहिती नाही असे खोटे सांगितले. त्यानंतर श्रीमती चव्हाण मॅडम व पथकातील इतर अधिकारी कर्मचारी यांनी श्री. अभिजीत पाटील यांच्या शासकीय वाहनातील ऑपरेटर श्री. तानाजी यादव व चालक श्री. कृष्णा जाधव यांना स्वतंत्रपणे विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांच्याकडुन माहिती समजली की, श्री. अभिजीत पाटील हे कोरेगाव येथे येत असताना पळशी स्टेशन रेल्वे फाटक येथे गाडीतुन उतरुन गेल्याचे सांगितले. त्यावरुन सदर ठिकाणी स्टाफ व पंचांच्या मदतीने सदर परिसरात फिरुन बराच शोध घेतला असता, श्री. पाटील यांनी माझेकडुन जबरदस्तीने हिसकावुन घेतलेला मोबाईल फोन हा तोडलेला स्थितीत तेथे मिळुन आला तसेच सदर ठिकाणी श्री. पाटील यांनी फाडुन फेकलेले चेक, डी. डी. तसेच फाडलेल्या लखोठयाचे तुकडे मिळुन आले परंतु माझ्याकडे कारवाईच्या दरम्यान दिलेला व्हाईस रेकॉर्डर सदर ठिकाणी/परिसरात मिळुन आला नाही.

तरी दिनांक १७/०४/२०१९ रोजी सकाळी ०९.१५ ते दिनांक १८/०४/२०१९ रोजीचे ०२.३० वाजणेचे दरम्यान मी, डॉ. श्री. अभिजीत शिवाजीराव पाटील, वय ३६ वर्षे, धंदा - नोकरी, उप विभागीय पोलीस

पोलीस ठाणे अंमलदार
फलटण पोलीस स्टेशन

अधिकारी, उप विभाग फलटण, जि. सातारा, रा. शासकीय निवासस्थान, फलटण, मुळ रा. प्लॉट नं. ६, स्वातंत्र सैनिक कॉलनी, राजेंद्रनगर, कोल्हापुर यांच्याविरुध्द दिलेली लाचेच्या मागणीची तक्रार, सदर तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष केलेली पडताळणी कारवाई, दरम्यान लोकसेवक श्री. अभिजीत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग फलटण, जि. सातारा यांनी माझ्याकडे माझे तीन्ही पक्षकार यांना खंडाळा पो.स्टे येथे दाखल असलेल्या गुन्हयातील आरोपी श्री. वैभव धामणकर व त्यांची पत्नी सौ. निलम धामणकर यांच्याकडुन श्री. रामदास जाधव यांचा रक्कम रुपये ८ लाखाचा डी. डी. देणेकरीता २,५०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन १,७५,०००/- रुपये लाच रक्कम घेवुन येण्यास सांगितले व ला.प्र.वि.पुणे विभागाकडुन आयोजित सापळा कारवाई दरम्यान त्यांना कांहीतरी संशय आल्याने त्यांनी त्यांच्या उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग फलटण जि.सातारा येथील सरकारी कार्यालयापासुन मला जबरदस्तीने त्यांच्या शासकीय वाहनामध्ये बसवुन, मला पळवुन नेवुन, माझा सॅमसंग कंपनीचा मोबाईल हँडसेट किंमत ९,०००/- रूपये व माझेकडील शासकीय व्हाईस रेकॉर्डर त्यामधील मेमरीकार्डसह किंमत ६,५००/- रूपये जबरदस्तीने माझ्याकडुन हिसकावुन घेवुन मला हाताने मारहाण करुन माझे कडील मोबाईलचे मोडतोड करून नुकसान केले आहे. व्हाईस रेकॉर्डर व त्यातील मेमरी कार्ड मध्ये पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेले लाचेच्या संदर्भातील संभाषण हे नष्ट करून पुरावा नष्ट केलेला आहे. सापळा कारवाईचा संशय आल्याने लाच रक्कम १,७५,०००/- रुपयाचा स्विकार केला नाही म्हणुन माझी लोकसेवक श्री. अभिजीत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग फलटण, जि. सातारा यांच्या विरुध्द फिर्याद आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणे प्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहिला तो बरोबर व खंरा आहे.

समोर

पोलीस ठाणे अंमलदार
फलटण पोलीस स्टेशन

हा जबाब दिला स.ता.म.